# मुंबई विद्यापीठ

ताबडतोब/तात्काळ /हस्ते बटवडा

क. संलग्नता /आय.सी.सी./२०१७–१८/१६

## परिपत्रक:-

सर्व संलग्नित (शासकीय व अशासकीय) अनुदानित व विना अनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य/ संस्थांचे संचालक यांना सहसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मादामा कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई–४०० ०३२ यांच्या पत्र क्र. संकीर्ण–२०१७/प्र.क्र.५४०/विशि–३ दिनांक २७ ऑक्टोबर, २०१७ अन्वये कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून शैक्षणिक संस्थेच्या परिसरात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे, सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक संस्थेत ओळखपत्र लावणे बंधनकारक करणे, योग्य ठिकाणी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करणे इ. उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत पुरेशा व योग्य उपाययोजना करणे आवश्यक आहे.

तरी सर्व संबंधितांनी याबाबत तात्काळ कार्यवाही करावी व विद्यापीठास अवगत करावे.

मुंबई – ४०० ०३२.
१० नोव्हेंबर, २०१७

(डॉ. दिनेश कांबळे)
प्र. कुलसचिव

प्रति,

मुंबई विद्यापीठाच्या सर्व संलग्नित (शासकीय व अशासकीय) अनुदानित व विना अनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य व संस्थाचे संचालक, यांस.

प्रत माहितीसाठी:–

१. मा. सहसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.
२. मा. संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पूणे – ४११ ००१.
३. मा. संचालक, तंत्र शिक्षण विभाग, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन, ३, महापालिका मार्ग, मुंबई – ४०० ००१.

प्रत: माहितीसाठी योग्य त्या कार्यवाहिसाठी:–

१. उपकुलसचिव, जनसंपर्क विभाग, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.
२. उपकुलसचिव, विशेष कक्ष, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.
३. (निवडनस्ती) मुंबई विद्यापीठ मुंबई – ४०० ०३२.

कृ.मा.पा

ई-मेल द्वारे

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक : संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ५४०/विशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २७/१०/२०१७.

प्रति,

कुलगुरु/कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे.

विषय :- राज्यातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने अलीकडच्या काळात वर्तमानपत्र/इलेक्ट्रॉनिक मिडीयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांवर होणारे रॅगिंग, दहशत, लैंगिक शोषण इ. बाबी निदर्शनास येत आहेत.

२. विद्यापीठे व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची सुरक्षितता पहाणे व त्यानुषंगाने पुरेशा उपाययोजना करणे ही बाब संबंधित शैक्षणिक संस्थेच्या कार्यकक्षेतील असली तरीही संबंधित विद्यापीठे व महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून शैक्षणिक संस्थेच्या परिसरात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे, सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक संस्थेत ओळखपत्र लावणे बंधनकारक करणे, योग्य ठिकाणी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करणे इ. उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे.

३. सबब, आपणास विनंती करण्यात येते की, आपण प्रस्तुत प्रकरणी व्यक्तीगत लक्ष घालून आपल्या विद्यापीठातील व आपल्या विद्यापीठाच्या अधिनस्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत पुरेशा व योग्य उपाययोजना करुन केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास १५ दिवसाच्या आत अवगत करावे, ही विनंती. सदर प्रकरणाबाबतचा अहवाल मा. राज्यमंत्री महोदयांना सादर करावयाचा असल्याने आपल्याकडून प्राधान्याने कार्यवाही अपेक्षित आहे.

(सिध्दार्थ खरात)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

संचालक, उच्च शिक्षण, पुणे.
मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
निवडनस्ती.